नि.दि.मु.क्र.०१/२०२३
आशिष वि. माया

## नि.क्र.23 खालील आदेश
## (CNR NO.MHAK020043462022)

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ यांनी तिच्याविरुध्द झालेला विना लेखी जवाब दाखल करणेचा आदेश रद्द करुन प्रतिवादी क्र.१ चा लेखी जवाब दाखल करण्याची परवानगी या अर्जान्वये मागितली आहे.

२. प्रस्तुतच्या अर्जामध्ये प्रतिवादी क्र.१ चे असे म्हणणे आहे की, ती वयोवृध्द असुन तीला रक्तताबाचा त्रास आहे. तसेच काही व्यक्तीक कारणामुळे मागच्या तारखेला ती लेखी जवाब दाखल करु शकली नाही. त्यामुळे तिने लेखी जवाब दाखल करण्याची परवानगी मिळणेची विनंती केली आहे.

३. वादी यांनी सदर अर्जास विरोध दर्शवून म्हणणे दिले आहे की, मा. न्यायालयाने लेखी जवाब दाखल करण्याचा अर्ज खारीज केला आहे. तसेच लेखी जवाब दाखल करण्याकरीता असेलला वेळ संपलेला आहे. तसेच प्रकरणामध्ये नि.क्र.५ वर सुनावणी सुध्दा झालेली आहे. त्यामुळे प्रतिवादी क्रमांक १ चा अर्ज फेटाळण्यात यावा.

४. दोन्ही पक्षाचे ऐकले. अभिलेख व अर्जामधील मजकूर पाहता असे दिसते की, प्रतिवादी क्रमांक १ हिने नमुद केलेली कारणे संयुक्तिक वाटतात व त्यामुळे त्यांनी लेखी जवाब दाखल करण्याचे कारण नमूद केले आहे असे दिसते. तसेच सदरचा अर्ज मंजूर करण्यास प्रतिवादी क्र.१ ला जो काही विलंब झाला आहे त्याबाबत वादी यांना योग्य ती कॉस्ट देणे योग्य आहे व तसे

केल्याने वादीचे कुठलेही न भरुन येणारे नुकसार होणार नाही. त्यामुळे मी पुढील आदेश करीत आहे.

**आदेश**

१. प्रतिवादी क्रमांक १ यांनी वादीला कॉस्ट रक्कम रु. ५००/- (रुपये पाचशे फक्त ) देणेसह अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्रमांक १ यांनी कॉस्टीची रक्कम दिल्यावर लेखी जवाब दाखल अभिलेखावर दाखल करावा

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by NIKHIL DHANAJIRAO JADHAV
Date: 2023.07.15 11:06:28 +0530

( एन. डी. जाधव )

दिनांकः १०.०७.२०२३. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
अकोला.

नि.दि.मु.क्र.०१/२०२३
आशिष वि. माया

**-:CERTIFICATE:-**

I affirm that the contents of this P.D.F. file, order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Pramod M. Ingle |
| Court Name | :- | Jt. Civil Court, (J.D.), Akola. |
| Date of decision | :- | 10/07/2023 |
| Order signed by PO. on | :- | 12/07/2023 |
| Order uploaded on | :- | 15/07/2023 |